Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# वीतराग विज्ञान पाठमाला

(मराठी)

भाग १



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# वीतराग-विज्ञान पाठमाला भाग १

( श्री वीतराग–विज्ञान विद्यापीठ परीक्षाबोर्डद्वारे निर्धारित )

: लेखक व संपादक :

**डॉ. हुकमचन्द भारिल्ल**

शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न, एम. ए. पीएच. डी.
संयुक्तमंत्री, पंडित टोडरमल स्मारक ट्रस्ट, जयपूर.

प्रकाशक :

**पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट**

ए–४, बापूनगर, जयपुर-३०२०१५

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates


| | | |
|---|---|---|
| **मराठी :** | | |
| प्रथम दो संस्करण | : | १० हजार |
| (१९८१ से १९८४ तक) | | |
| तृतीय संस्करण | : | ३ हजार |
| (२१ अक्टूबर १९९६) | | |
| **हिन्दी :** दस संस्करण | : | ७१ हजार ८०० |
| **गुजराती :** दो संस्करण | : | ८ हजार २०० |
| **कन्नड़ :** दो संस्करण | : | ४ हजार |
| **अंग्रेजी :** प्रथम संस्करण | : | ५ हजार |
| **योग :** | | **१ लाख २ हजार** |

मूल्य : **तीन रुपया**


## विषय - सूची


| क्रम | नाव पाठ | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | देव- स्तुती | ३ |
| २. | आत्मा आणि परमात्मा | ९ |
| ३. | सात तत्त्व | १२ |
| ४. | षट् आवश्यक | १६ |
| ५. | कर्म | १८ |
| ६. | रक्षाबंधन | २२ |
| ७. | जम्बूस्वामी | २५ |
| ८. | बारा भावना | २९ |


Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

## Thanks & Our Request

This shastra has been kindly donated by Dakshaben Sanghvi, Geneva, Switzerland who has paid for it to be "electronised" and made available on the internet.

Our request to you:

1) Great care has been taken to ensure this electronic version of Vitraag Vignaan Pathmala – Part 1 (Marathi) is a faithful copy of the paper version. However if you find any errors please inform us on rajesh@AtmaDharma.com so that we can make this beautiful work even more accurate.

2) Keep checking the version number of the on-line shastra so that if corrections have been made you can replace your copy with the corrected one.

## Version History

| Version Number | Date | Changes |
|---|---|---|
| 001 | 19 July 2008 | First electronic version |

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ १

# देव-स्तुती

पं. दौलतरामजी

## दर्शन–स्तुती

### दोहा

सकल ज्ञेय ज्ञायक तदपि,
निजानंद रसलीन।
सो जिनेंद्र जयवंत नित
अरिरजरहस विहीन ॥ १ ॥

### पद्धरि छंद

जय वीतराग–विज्ञानपूर।
जय मोहतिमिर को हरन सूर॥
जय ज्ञान अनंतानंत धार।
दृगसुख वीरजमंडित अपार ॥२॥

जिनेंद्र देवांची स्तुती करताना पं. दौलतरामजी म्हणतात की– हे जिनेंद्र देव! आपण सगळ्या ज्ञेयांचे (लोकालोकाचे) ज्ञाता असताना-सुद्धा आपल्या आत्म्याच्या आनंदात लीन असता. चार घातिया कर्म ज्यांचे निमित्त आहेत, अशा मोह–राग- द्वेष - अज्ञान इत्यादी विकारांनी रहित आहात, हे प्रभो ! आपला जय हो जय हो ॥१॥

आपण मोह–राग–द्वेष रूपी अंधःकाराचा नाश करणारे वीतरागी सूर्य आहात. अनंत ज्ञानाचे धारक आहात, म्हणून पूर्णज्ञानी (सर्वज्ञ) आहात, आणि अनंत दर्शन, अनंतसुख आणि अनंत वीर्य यांनीदेखील सुशोभित आहात. हे प्रभो ! आपला जय हो जय हो ॥२॥



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

जय परमशांत मुद्रा समेत ।
भविजन को निज अनुभूति हेत ।
भवि भागन वचजोगेंवशाय ।
तुम धुनि ह्वै सुनि विभ्रम नशाय ।।३।।

तुम गुण चिंतत निजपर विवेक ।
प्रगटै विघटै आपद अनेक ।
तुम जगभूषण दूषणवियुक्त ।
सब महिमायुक्त विकल्प मुक्त ।।४।।

अविरूद्ध, शुद्ध, चेतन–स्वरूप ।
परमात्म परम पावन अनूप ।।
शुभ अशुभ विभाव अभाव कीन ।
स्वाभाविक परिणतिमय अछीन ।।५।।

अष्टादश दोष विमुक्त धीर ।
सचतुष्टयमय राजत गंभीर ।।
मुनिगणधरादि सेवत महंत ।
नव केवल लब्धिरमा धरंत ।।६।।

तुम शासन सेय अमेय जीव ।
शिव गये जाहि जैहैं सदीव ।।
भवसागर में दुख छार वारि ।
तारन को और न आप टारि ।।७।।

यह लखि निज दुखगद हरणकाज ।
तुमही निमित्त कारण इलाज ।।
जाने तातैं मैं शरण आय ।
उचरों निज जो दुख चिर लहाय ।।८।।



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

हे भगवन ! भव्य जीव आपली परम शांतमुद्रा पाहून आत्म-अनुभूतीच्या प्राप्तीसाठी स्वलक्ष्यी बनतात. भव्य जीवांच्या भाग्याने आणि आपल्या वचन योगाने आपली दिव्यध्वनी खिरते. तिचे श्रवण करून भव्य जीवांचा भ्रम नाहिसा होतो. ॥३॥

आपल्या गुणांचे चिंतवन केल्याने स्व-पर भेद-विज्ञान होते. आणि मिथ्यात्व दशेमध्ये होणाऱ्या अनेक आपत्ती (विकार) नाहीशा होतात. आपण सगळ्या दोषांनी रहित आहात. सगळ्या विकल्पापासून मुक्त आहात, सगळ्या प्रकारची महिमा धारण करणारे आहात आणि जगाचे भूषण आहात अर्थात जगाला सुशोभित करणारे आहात. ॥४॥

हे परमात्मा ! आपण सर्व उपमांनी रहित, परम पवित्र, शुद्ध, चेतन (ज्ञान दर्शन) मय आहात. आपणामध्ये कोणत्याही प्रकारचा विरोध–भाव नाही. आपण शुभ आणि अशुभ दोन्ही प्रकारच्या विकारी–भावांचा अभाव केला आहे आणि स्वभाव–भावाने युक्त झालेले आहात, म्हणून आपणास कधीही क्षीण दशा प्राप्त होणार नाही ॥५॥

आपण अठरा दोषांपासून रहित आहात आणि अनंत चतुष्टय युक्त विराजमान आहात. केवलज्ञानादी नऊ प्रकारच्या क्षायिक भावांना धारण करणारे असल्यामुळे महान मुनी व गणधर देव इत्यादी आपली सेवा करतात. ॥६॥

आपण सांगितलेल्या मार्गाने चालल्यामुळे अनंत जीव मुक्त झालेले आहेत, होत आहेत आणि नेहमी होत राहतील. या संसार रूपी समुद्रामध्ये दुःखरूपी खारे पाणी अथांग भरलेले आहे. या समुद्रातून आपल्याशिवाय दुसरा कोणीही तारणारा नाही. ॥७॥

या भयंकर दुःखाला दूर करण्यामध्ये निमित्त कारण आपणच आहात, असे जाणून मी आपणास शरण आलो आहे आणि अनंत काळापासून भोगलेले दुःख आपणास सांगत आहे ॥८॥



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

मैं भ्रम्यो अपनपो विसरि आप ।
अपनाये विधि फल पुण्य पाप ॥
निज को पर को करता पिछान ।
पर में अनिष्टता इष्ट ठान ॥९॥

आकुलित भयो अज्ञान धारि ।
ज्यों मृग–मृगतृष्णा जानि वारि ॥
तन परिणति में आपो चितार ।
कबहूँ न अनुभवो स्वपदसार ॥१०॥

तुमको बिन जाने जो कलेश ।
पाये सो तुम जानत जिनेश ॥
पशु, नारक, नर, सुरगति मँझार ।
भव धर धर मर्यो अनंत बार ॥११॥

अब काललब्धि बलतैं दयाल ।
तुम दर्शन पाय भयो खुशाल ॥
मन शांत भयो मिटि सकल द्वंद ।
चाख्यो स्वातम–रस दुख–निकंद ॥१२॥

तातैं अब ऐसी करहु नाथ ।
बिछुरै न कभी तुव चरण साथ ॥
तुम गुणगण को नहिं छेव देव ।
जग तारन को तुव विरद एव ॥१३॥

आतम के अहित विषय–कषाय ।
इनमें मेरी परिणति न जाय ॥
मैं रहूँ आप में आप लीन ।
सो करो होउँ ज्यों निजाधीन ॥१४॥

मेरे न चाह कछु और ईश ।
रत्नत्रय निधि दीजे मुनीश ॥
मुझ कारज के कारण सु आप ।
शिव करहु हरहु मम मोहताप ॥१५॥



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

मी आपल्या ज्ञानस्वभावी आत्म्याला विसरून स्वतःच संसारात भ्रमण करीत आहे आणि पुण्य–पापरूप कर्म फळाला मी आपले मानले आहे. स्वतःस पराचा कर्ता मानले आहे आणि परास आपला कर्ता मानले आहे व पर पदार्थांपैकी काहींना इष्ट मानले आहे तर काहींना अनिष्ट मानले आहे. परिणामस्वरूप अज्ञानाला धारण करून स्वतःच आकुलित झालो आहे. ज्याप्रमाणे हरीण तृष्णावश होऊन मृगजळाला पाणी समजून आपल्याच अज्ञानामुळे दुःखी होते. त्याप्रमाणे शरीराच्या अवस्थांना आपली अवस्था समजून मी आपल्या पदाचा (आत्म–स्वभावाचा) अनुभव केला नाही. ।।९–१०।।

हे जिनेश ! आपणास न ओळखल्यामुळे जे दुःख मी भोगले आहे त्यास आपण जाणतच आहात. तिर्यंच गती, नरक गती, मनुष्य गती, देव गतीमध्ये उत्पन्न होवून अनंत वेळा मरणाचे दुःख भोगले आहे. ।।११।।

आता काललब्धी आल्यामुळे आपले दर्शन झाले आहे. यामुळे मला फार प्रसन्नता वाटत आहे. माझे अंतर्द्वंद्व समाप्त झाले आहे. आणि माझे मन शांत झाले आहे. मी दुःखाचा नाश करणाऱ्या आत्मानुभूतीला प्राप्त केले आहे. ।।१२।।

म्हणून हे नाथ! आता असे करा की, ज्यामुळे आपल्या चरणांचा वियोग होणार नाही. तात्पर्य हे की, ज्या मार्गाने (आचरणाने) आपण पूर्ण सुखी झालात, मी पण तोच मार्ग प्राप्त करीन. हे देव आपल्या गुणांना कुठलाच अंत नाही आणि संसारातून पार करविण्याचा तर जणू आपला पणच आहे. ।।१३।।

पाचही इंद्रियांच्या विषयामध्ये लीनता आणि कषाय करणे हे आत्म्याचे अहित करणारे आहे. हे प्रभो! इकडे माझा ओढा नसावा अशी मी इच्छा करतो. मी तर आपल्या आत्म्यातच लीन राहीन ज्यामुळे मी पूर्ण स्वाधीन होईन. ।।१४।।

माझ्या मनात आणखी काही इच्छा नाही, फक्त एक रत्नत्रय निधीच प्राप्त करण्याची इच्छा आहे, माझ्या हितरूपी कार्याचे निमित्त कारण आपणच आहात. माझा मोह ताप नष्ट होवून कल्याण होवो हीच भावना आहे. ।।१५।।

शशि शांतिकरन तपहरन हेत ।
स्वयमेव तथा तुम कुशल देत ।।
पीवत पीयूष ज्यों रोग जाय ।
त्यों तुम अनुभवतें भव नशाय ।।१६।।

त्रिभुवन तिहुँकाल मँझार कोय ।
नहिं तुम बिन निज सुखदाय होय ।।
मो उर यह निश्चय भयो आज ।
दुख–जलधि उतारन तुम जहाज ।।१७।।

**दोहा**

तुम गुणगणमणि गणपति,
गणत न पावहिं पार ।
'दौल' स्वल्पमति किम कहै,
नमुँ त्रियोग सँभार ।।१८।।

जसा चंद्रमा स्वयमेव उष्णता कमी करून शीतलता प्रदान करतो, त्याचप्रमाणे आपली स्तुती केल्यामुळे स्वतःच आनंद प्राप्त होतो. जसे अमृत पानामुळे रोग नाहीसा होतो. त्याचप्रमाणे आपला अनुभव केल्यामुळे संसाररूपी रोग नाहीसा होतो. ।।१६।।

तिन्ही लोकांत आणि तिन्ही काळात आपल्या सारखा सुखदायक (सन्मार्ग–दर्शक) आणखी कोणी नाही. माझा आज असा निश्चय झाला आहे की, आपणच दुःखरूपी समुद्रातून पार करणारे जहाज आहात ।।१७।।

आपल्या गुण–रूपी मण्यांना मोजण्यास गणधर देव सुध्दा समर्थ नाहीत, तर मी (दौलतराम) अल्पबुद्धी त्यांचे वर्णन कसा करू शकेल? म्हणून मी आपणास मन, वचन व कायेला सांभाळून वारंवार नमस्कार करतो. ।।१८।।

**प्रश्न :–** वरील स्तुतीमधील आपणास आवडलेले दोन छंद लिहा. व ते आवडण्याचे कारण सांगा.

---

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ २

# आत्मा आणि परमात्मा

## मुनिराज योगीन्दु
## (व्यक्तित्व आणि कर्तृत्व)

अपभ्रंश भाषेचे महाकवी अध्यात्मवेत्ते योगीन्दु यांच्या जीवनाविषयी विशेष माहिती आतापर्यंत उपलब्ध झालेली नाही. त्यांच्या नावाचा पण पुष्कळ प्रकारे उल्लेख मिळतो, जसे योगींदु, योगींद्र. परंतु अपभ्रंशच्या जोइन्दु या नावाचा संस्कृत अनुवाद योगीन्दुच योग्य होतो योगींद्र नाहीं.

योगींदूंच्या कालाविषयीसुद्धा वेगवेगळी मते आहेत, त्यांचा काळ सहाव्या शताब्दीपासून अकराव्या शताब्दीपर्यन्त मानला जातो.

त्यांच्या ग्रथांवर आचार्य कुन्दकुन्दांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. योगीन्दूंनी कुन्दकुन्दांपासून पुष्कळच घेतले आहे.पूज्यपादांचे समाधिशतक आणि योगीन्दूंचे परमात्मप्रकाश यात घनिष्ठ समानता दिसून येते.

त्यांनी लिहिलेले परमात्मप्रकाश (परमप्पयासु) व योगसार (जोगसारू) हे ग्रंथच त्यांच्या किर्तीचे अक्षय भांडार आहेत. या ग्रंथांमध्ये त्यांनी अध्यात्माच्या गूढतत्त्वांना सहज सरळ, आणि लोकभाषेत ठेवले आहे. प्रस्तुत पाठावरील ग्रंथांच्या आधारावर लिहिला आहे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

## आत्मा आणि परमात्मा

**प्रभाकर**- हे गुरुदेव ! आत्मा आणि परमात्मा यांचे स्वरूप काय आहे ? हे कृपा करून सांगावे. कारण काल आपण सांगितले होते की, हा आत्मा आपल्या स्वरूपाला विसरून दुःखी होत आहे.

**योगीन्दु देव** –हे प्रभाकर भट्ट ! आत्म्याला समजून घेण्याची इच्छा तुमच्यासारख्या मुमुक्षुंनाच होते. ज्याने चैतन्य स्वरूप आत्म्याची गोष्ट प्रसन्न चित्ताने ऐकली तो जीव अल्पकाळातच परमात्म–पदाला प्राप्त करील. आत्मज्ञानासारखा दुसरा कोणताही सार नाही.

ज्ञानस्वभावी जीव तत्त्वालाच आत्मा म्हणतात. तो अवस्थेच्या अपेक्षेने तीन प्रकारचा आहे.

१. बहिरात्मा २. अंतरात्मा ३. परमात्मा

**प्रभाकर**-बहिरात्मा कोणाला म्हणतात ?

**योगीन्दु देव**– शरीराला आत्मा व अन्य पदार्थांमध्ये आणि रागादीमध्ये आपलेपणा मानणारा किंवा शरीर आणि आत्म्याला एक मानणारा जीवच बहिरात्मा आहे. तो अज्ञानी (मिथ्यादृष्टी) आहे.

आत्म्याला सोडून दुसऱ्या बाह्य पदार्थांमध्ये आत्मपणा (आपले-पणा) मानल्यामुळे यास बहिरात्मा म्हटले जाते. अनादीकाळापासून हा आत्मा शरीराच्या उत्पत्तीमध्येच आपली उत्पत्ती आणि शरीराच्या नाशामध्येच आपला नाश व शरीराशी संबंध ठेवणाऱ्यांना आपले मानत आला आहे जोपर्यंन्त हा भ्रम निघत नाही तोपर्यंन्त जीव बहिरात्मा अर्थात मिथ्यादृष्टी राहतो.

**प्रभाकर** – "बहिरात्मपणा सोडावयास पाहिजे" हे तर ठीकच पण - - -

**योगीन्दु देव** – बहिरात्मपणा सोडून अंतरात्मा बनले पाहिजे.

जी व्यक्ति भेद–विज्ञानाच्या बळाने आत्म्याला देहादिकांपासून भिन्न ज्ञान आणि आनंद–स्वभावी जाणते, मानते आणि अनुभवते ती व्यक्ती ज्ञानी आत्मा (सम्यग्दृष्टी) च अंतरात्मा आहे. आत्म्यामध्येच आत्मपणा अर्थात आपलेपणा मानल्यामुळे व आत्म्याशिवाय इतर कोण-त्याही पदार्थामधील आपलेपणाची मान्यता सोडल्यामुळेच त्याला अंत-रात्मा म्हटले जाते. अंतरात्मा तीन प्रकारचा आहे.

१. उत्तम अंतरात्मा २. मध्यम अंतरात्मा ३. जघन्य अंतरात्मा

अंतरंग व बहिरंग दोन्ही प्रकारच्या परिग्रहांनी रहित उत्कृष्ट शुद्धोपयोगी क्षीणकषाय मुनि (बारावे गुणस्थानवर्ती) उत्तम अतरात्मा होत. अविरत सम्यग्दृष्टी (चौथे गुणस्थानवर्ती) जघन्य अंतरात्मा आहेत. वरील दोहोंच्या मध्यदशेमधील देशव्रती श्रावक आणि मुनिराज (पाचव्यापासून बाराव्या गुणस्थानापर्यंन्त) मध्यम अंतरात्मा आहेत.

**प्रभाकर** – अंतरात्मा बनल्यामुळे काय लाभ होतो ?

**योगीन्दु देव**– हाच अंतरात्मा गृहस्थावस्थेचा त्याग करून शुद्धोपयोग रूप मुनिअवस्था धारण करून निजस्वभाव साधनाद्वारे परमात्मपद प्राप्त करतो अर्थात परमात्मा बनतो. आणि त्यास अनंत दर्शन, अनंतज्ञान, अनंत सुख आणि अनंत वीर्य प्रगट होते, तात्पर्य असे आहे की, हाच अंतरात्मा आपल्या पुरुषार्थाद्वारे पुढे प्रगती करून परमात्मा बनतो.

**प्रभाकर** – परमात्मा होण्यामुळे काय लाभ आहे ?

**योगीन्दु देव** – प्रत्येक आत्मा सुखी होण्याची इच्छा करतो. परमात्मा पूर्ण निराकुल असल्यामुळे अनंत सुखी आहे. परमात्मा दोन प्रकारचा आहे.

१. सकल परमात्मा २. निकल परमात्मा

चार घातिकर्मांचा अभाव करणारे श्री अरिहंत भगवान शरीरसहित असल्याने त्यांना सकल परमात्मा म्हणतात आणि कर्मांने रहित सिद्ध भगवंत शरीररहित असल्यामुळे त्यांना निकल परमात्मा म्हणतात

बहिरात्मा संसारमार्गी असल्यामुळे बहिरात्मपणा सर्वथा हेय आहे. अंतरात्मा मुक्तिमार्गाचा पथिक आहे म्हणून अंतरात्मपणा कथंचित उपादेय आहे व परमात्मपणा अतींद्रिय सुखमय असल्यामुळे सर्वथा उपादेय आहे.

म्हणून सर्वांनी पुरुषार्थपूर्वक बहिरात्मपणा सोडून अंतरात्मा बनून परमात्मा बनण्याची भावना करावयास पाहिजे.

**प्रश्न**—

१. आत्मा कशास म्हणतात ? तो किती प्रकारचा आहे ? बहिरात्म्याचे स्वरूप लिहा.
२. अंतरात्म्याचे लक्षण भेद स्पष्ट करा.
३. परमात्मा कोणाला म्हणतात ? सकल व निकल परमात्म्याला स्पष्ट करा.
२. मुनिराज योगीन्दूंच्या व्यक्तित्व व कर्तृत्वावर संक्षिप्त टीप लिहा.

---

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ३ | सात तत्त्व

## आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामी
(व्यक्तित्व एवं कर्तृत्व)

तत्त्वार्थसूत्रकर्त्तारं, गृद्धपिच्छोपलक्षितम् ।
वन्दे गणीन्द्रसंजातमुमास्वामीमुनीश्वरम ॥

कमीत कमी लिहून जास्तीत जास्त प्रसिद्धी मिळवणाऱ्या आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामींच्या तत्त्वार्थसूत्राशी जैन समाज जेवढा अधिक परिचित आहे, तेवढाच त्यांच्या जीवन चरित्राशी अपरिचित आहे.

हे कुन्दकुन्दाचार्यांचे पट्ट शिष्य होते आणि विक्रमसंवतच्या प्रथम शताब्दीच्या अंतिम काळामध्ये तथा द्वितीय शताब्दीच्या पूर्वार्धामध्ये यांनी भारतभूमीला पवित्र केले होते.

ज्यांना समग्र आचार्य परंपरेमध्ये पूर्ण प्रामाणिकता आणि सन्मान प्राप्त झाला आहे, त्या गौरवशाली आचार्यांमध्ये आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामी एक आहेत. जे महत्व वैदिकांमध्ये गीतेला, ख्रिश्चनांमध्ये बायबलला आणि मुसलमानामध्ये कुराणाला आहे, तेच महत्व जैन परंपरेमध्ये गृद्धपिच्छ उमास्वामींच्या तत्त्वार्थसूत्राला प्राप्त झाले आहे. याचे दुसरे नाव मोक्षशास्त्रसुद्धा आहे. हा संस्कृत भाषेतील सर्वप्रथम जैन ग्रंथ आहे.

हा ग्रंथराज जैन समाजाद्वारे संचालित सगळ्या परीक्षा बोर्डाच्या पाठ्यक्रमामध्ये नेमलेला आहे. आणि सगळ्या भारतवर्षाच्या जैन विद्यालयांमध्ये शिकवला जातो.

प्रस्तुत पाठ तत्त्वार्थसूत्राच्या आधारावर लिहिला गेला आहे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# सात तत्त्व

**प्रवचनकार**–संसारात सर्व प्राणी दुःखी आहेत,आणि ते दुःखापासून सुटण्याचा उपायदेखील करतात. परन्तु प्रयोजनभूत तत्त्वांचे खरे ज्ञान आणि श्रद्धान असल्याशिवाय दुःख दूर होत नाही.

**मुमुक्षु**–ज्यांच्या ज्ञानाशिवाय आणि खऱ्या श्रद्धेशिवाय दुःख दूर होऊ शकत नाही, अशी प्रयोजनभूत तत्त्वे कोणती आहेत ?

**प्रवचनकार**–दुःख दूर करणे आणि सुखी होणे हेच खरे प्रयोजन आहे आणि ज्यांच्या सम्यक् श्रद्धेशिवाय आमचे दुःख दूर होऊ शकणार नाही व आम्ही सुखी बनू शकणार नाही, त्या तत्त्वांनाच प्रयोजनभूत तत्त्वे म्हणतात. तत्त्व म्हणजे वस्तुचे खरे स्वरूप, जी वस्तु जशी आहे तसाच भाव, तेच तत्त्व होय.

ती तत्त्वे सात आहेत. जसे तत्त्वार्थ सूत्रात आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामींनी म्हटले आहे.

जीवाजीवास्रवबंधसंवरनिर्जरामोक्षास्तत्त्वम् ॥१॥४॥

जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा आणि मोक्ष ही सात तत्त्वे आहेत.

**प्रश्नकर्ता** – कृपया संक्षेपामध्ये यांचे स्वरूप सांगावे.

**प्रवचनकार** – जीवतत्त्व ज्ञान दर्शन स्वभावी आत्म्याला म्हणतात. ज्ञान दर्शन स्वभावाने रहित व आत्म्यापासून भिन्न सर्व द्रव्यांना (पदार्थांना) अजीव तत्त्व म्हणतात. पुद्गलादी सर्व पदार्थ अजीव आहेत.

या शरीरादी सगळ्या अजीव पदार्थांपासून भिन्न चेतन तत्त्वच आत्मा आहे. तो आत्माच मी आहे. माझ्यापासून भिन्न पुद्गलादी पाच द्रव्य अजीव आहेत.

सामान्य रूपाने तर जीव अजीव ही दोनच तत्त्वे आहेत, आस्रवादिक जीव अजीवाचेच विशेष आहेत.

**शंकाकार** – जर आस्रवादिक जीव अजीवाचे विशेष आहेत तर त्यांना वेगळे का सांगितले आहे ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

**प्रवचनकार** – येथे तर मोक्षाचे प्रयोजन आहे. म्हणून आस्रवादिक पाच पर्यायरूप विशेष तत्त्व सांगितले आहे. वरील सात तत्त्वांच्या यथार्थ श्रद्धानाशिवाय मोक्षमार्ग होऊ शकत नाही, कारण जीव आणि अजीवाला जाणल्याशिवाय स्व–पराचे भेद–विज्ञान कसे होईल? मोक्षाला जाणल्याशिवाय व त्यास आपले हितरूप मानल्याशिवाय त्याचा उपाय कसा केला जाईल ? मोक्षाचा उपाय संवर, निर्जरा आहे, म्हणून त्यांना जाणणे पण आवश्यक आहे. आस्रवाच्या अभावाला संवर म्हणतात व बंधाच्या एकदेश अभावाला (आंशिक अभाव) निर्जरा म्हणतात. म्हणून संवर निर्जरेला जाणल्याशिवाय आस्रवबंध सोडून संवर निर्जरारूप प्रवर्तन कसे केले जाईल ?

**शंकाकार** – आम्ही तर प्रवचनामध्ये ऐकले की, आत्मा तर त्रिकाल शुद्ध असून शुद्धाशुद्ध पर्यायापासून पृथक आहे तोच आश्रय–करण्यायोग्य आहे.

**प्रवचनकार** – भाऊ, ते द्रव्य – दृष्टीचे कथन आहे. प्रमाण दृष्टीने आत्मद्रव्य शुद्धाशुद्ध पर्यायांनी युक्त आहे.

**जिज्ञासू** – ही द्रव्यदृष्टी काय आहे ?

**प्रवचनकार** – सात तत्त्वांना यथार्थ जाणून समस्त परपदार्थ आणि शुभाशुभ आस्रवादिक विकारी भाव तथा संवरादिक अविकारी भाव या सर्वांपासून देखील भिन्न ज्ञानानंद-स्वभावी त्रिकाली ध्रुव आत्मतत्त्वच दृष्टीचा (श्रद्धेचा) विषय आहे. या दृष्टीच्या कथनामध्ये पर, विकार व भेद यांना गौण करून केवळ त्रैकालिक ज्ञान स्वभावालाच आत्मा म्हटले जाते. आणि त्याच्या आश्रयानेच धर्म (संवर निर्जरा) प्रगट होतो.

ज्या मोह-राग-द्वेष भावांच्या निमित्ताने ज्ञानावरणादी कर्म येतात त्या मोह-राग-द्वेष भावांना भावास्रव म्हणतात. त्यांच्या निमित्ताने ज्ञानावरणादी कर्मांचे स्वयं येणे द्रव्यास्रव आहे.

याचप्रकारे आत्मा अज्ञान, मोह-राग-द्वेष, पुण्य-पाप आदी विभाव भावांमध्ये गुंततो हा भाव-बंध आहे आणि त्याच्या निमित्ताने पुद्गलाचे स्वयं कर्मरूप होणे हा द्रव्यबंध होय.

**शंकाकार** – पुण्य–पापाला बंधाशी का जोडले ?

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**प्रवचनकार** – भाऊसाहेब ! पुण्य आणि पाप आस्रव बंधाचेच अवान्तर भेद आहेत. शुभ रागाने पुण्याचा आस्रव व बंध होतो. आणि अशुभ राग, द्वेष आणि मोह यांनी पापाचा आस्रव आणि बंध होतो. शुभ आणि अशुभ दोन्ही त्यागण्यायोग्य आहेत. कारण ते आस्रव आणि बंध तत्त्व आहेत.

पुण्य-पापाच्या विकारी भावांना (आस्रवाला) आत्म्याच्या शुद्ध (वीतरागी) भावांनी रोकणे हा भाव संवर आहे. आणि त्यानुसार नवीन कर्मांचे स्वयं येणे थांबणे यास द्रव्य-संवर म्हणतात.

याचप्रकारे ज्ञानानंद-स्वभावी आत्म्याच्या आश्रयाच्या सामर्थ्याने स्वरूपातील स्थिरतेच्या वृद्धीद्वारे आंशिक शुद्धीची वृद्धी आणि अशुद्ध ( शुभाशुभ ) अवस्थांचा आंशिक नाश करणे ही भाव-निर्जरा होय· आणि तिचे निमित्त मिळाले असताना जड कर्म अंशतः झडणे ही द्रव्य निर्जरा होय.

**प्रश्नकर्ता** – आणि मोक्ष !

**प्रवचनकार** – अशुद्ध दशेचा सर्वथा संपूर्ण नाश होऊन आत्म्याची पूर्ण निर्मल पवित्र दशा प्रकट होणे भाव-मोक्ष आहे आणि निमित्त कारण अशा द्रव्यकर्मांचा सर्वथा नाश होणे द्रव्य-मोक्ष आहे.

या सात तत्त्वांना सम्यक् प्रकारे जाणून आणि समस्त परतत्त्वां-वरून दृष्टी हटवून आत्मतत्त्वावर लक्ष्य केन्द्रीत करावे. हाच खरे सुख प्राप्त करण्याचा खरा उपाय आहे.

**प्रश्न—**

१. तत्त्वे कशाला म्हणतात ? ती किती प्रकारची आहेत ?
२. 'प्रयोजनभूत' शब्दाचा काय आशय आहे ?
३. पुण्य आणि पापाचा अंतर्भाव कोणत्या तत्त्वांमध्ये होतो व कसा हे स्पष्ट सांगा.
४. हेय आणि उपादेय तत्त्वांना सांगा.
५. द्रव्य-संवर, भाव-निर्जरा, भाव-मोक्ष, द्रव्यास्रव आणि भाव-बंध यांना स्पष्ट करा.
६. आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामींच्या व्यक्तित्व व कर्तृत्वाबद्दल माहिती द्या.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ ४

# षट् आवश्यक

(मंदिरात शास्त्र प्रवचन चालू आहे. पंडितजी शास्त्र प्रवचन करीत आहेत आणि सर्व श्रोते रूचीपूर्वक ऐकत आहेत.)

**प्रवचनकार** – संसारातील सर्व प्राणी सुखाची इच्छा करतात आणि दुःखाला भीतात, आणि दुःखापासून मुक्त होण्यासाठी उपाय पण करतात. पण दुःखापासून मुक्त होण्याचा खरा उपाय जाणत नाहीत म्हणून दुःखीच राहतात.

**एक श्रोता** – तर मग दुःखापासून मुक्त होण्याचा खरा उपाय कोणता ?

**प्रवचनकार** – आत्म्याला समजून त्यात लीन होणे हाच खरा उपाय आहे. आणि हेच निश्चयाने खरे आवश्यक कर्तव्य आहे.

**दुसरा श्रोता** – आपण तर साधु लोकांची गोष्ट सांगता, आमच्या सारख्या गृहस्थांनी खरे सुख प्राप्त करण्यासाठी काय करावे ?

**प्रवचनकार** – दुःख नाहीसे करण्याचा व खऱ्या सुखाच्या प्राप्तीचा उपाय सगळ्यांसाठी एकच आहे.

हा विषय वेगळा आहे की, मुनिराज आपल्या उग्र पुरुषार्थाने आत्म्याचे सुख विशेष रितीने प्राप्त करतात. व गृहस्थ आपल्या भूमिके-नुसार अंशतः सुख प्राप्त करतात.

वरील मार्गाने चालणाऱ्या सम्यग्दृष्टी श्रावकाला आंशिक शुद्धिरूप निश्चय आवश्यकाच्या बरोबर शुभ विकल्प पण येतात. त्यांना व्यवहार आवश्यक म्हणतात. ते सहा प्रकारचे आहेत,

देवपूजा गुरूपास्ति, स्वाध्याय संयमस्तपः ।
दानञ्चेति गृहस्थांना, षट् कर्माणि दिने दिने ॥

१. देवपूजा २. गुरुंची उपासना. ३. स्वाध्याय ४. संयम ५. तप ६. दान.

**श्रोता** – कृपया यांना संक्षेपामध्ये समजून सांगा.

**प्रवचनकार** – ज्ञानी श्रावकाची योग्य आंशिक शुध्दी निश्चयाने भावदेव-पूजा आहे, आणि खऱ्या देवाचे स्वरूप समजून त्यांच्या गुणांचे स्तवन व्यवहाराने भाव-देवपूजा आहे. ज्ञानी श्रावक वीतराग आणि

सवज्ञता आदी गुणांचे स्तवन करीत विधीपूर्वक अष्ट द्रव्याने पूजन करतात त्याला द्रव्यपूजा म्हणतात.

याचप्रकारे ज्ञानी श्रावकाची योग्य आंशिक शुद्धीच निश्चयाने गुरु उपासना आहे आणि गुरुंचे खरे स्वरूप समजून त्यांची उपासना करणे व्यवहार–गुरु उपासना आहे.

आपणास अगोदर सांगितलेच आहे की, अरिहंत आणि सिद्ध भगवंतांना देव म्हणतात आणि आचार्य उपाध्याय साधु यांना गुरु म्हणतात.

ज्ञानी श्रावकाची योग्य आंशिक शुद्धीच निश्चयाने स्वाध्याय आहे आणि जिनेंद्र भगवंतांनी सांगितलेल्या तत्त्वांचे निरूपण करणाऱ्या शास्त्रांचे अध्ययन, मनन करणे व्यवहार स्वाध्याय आहे.

**श्रोता** – हे तर तीन आवश्यक झालेत.

**प्रवचनकार** – ऐका ! ज्ञानी श्रावकाची योग्य आंशिक शुद्धीच निश्चयाने संयम आहे आणि त्याबरोबर होणाऱ्या भूमिकेनुसार हिंसादीपासून विरती व इंद्रिय–निग्रह–व्यवहार–संयम आहे.

ज्ञानी श्रावकाची योग्य आंशिक शुद्धी अर्थात् शुभाशुभ इच्छांचा निरोध (उत्पन्न न होणे) निश्चय– तप आहे व त्याच्याबरोबर अनशन आदि संबंधी होणारे शुभभाव व्यवहार– तप आहे.

ज्ञानी श्रावकाची योग्य आंशिक शुद्धी हेच निश्चयाने स्वतःला शुद्धतेचे दान आहे व स्व आणि पराच्या अनुग्रहासाठी धनादी देणे व्यवहार-दान आहे, ते चार प्रकारचे असते.

१. आहारदान २. ज्ञानदान ३. औषधी दान ४. अभयदान

**श्रोता**–निश्चय आणि व्यवहार आवश्यक यांच्यात काय अंतरआहे?

**प्रवचनकार** – निश्चय आवश्यक शुद्ध धर्म परिणति आहे, म्हणून बंधाच्या अभावाला कारण आहे आणि व्यवहार आवश्यक पुण्य बंधाचे कारण आहे. खरे आवश्यक ज्ञानी जीवांनाच असतात. परंतु देवपूजनादी करण्याचे भाव अज्ञानींना सुद्धा होतात. आणि मंद कषाय व शुभभावानुसार पुण्य बंध देखील होतो. पण त्यांना खरा धर्म म्हटले जाऊ शकत नाही.

**श्रोता** – जर आपण असे म्हणाल तर अज्ञानी जीव देवपूजनादी आवश्यक कर्मांना सोडून देतील.

**प्रवचनकार** – हे पहा! उपदेश तर वर चढण्यासाठी दिला जातो. म्हणून देवपूजनादिक शुभभावांना सोडून अशुभ भावामध्ये परिणत व्हाल तर पापबंधच कराल म्हणून देवपूजनादी सोडणे बरोबर नाही.

**प्रश्न**— १. सहा आवश्यकांची नांवे लिहून त्यांच्या व्याख्या द्या.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ५

# कर्म

## सिद्धांतचक्रवर्ती नेमिचंद्राचार्य

( व्यक्तित्व व कर्तृत्व )

जह चक्केण य चक्की, छक्खंडं साहियं अविक्षेण ।
तह मइ चक्केण मया, छक्खंडं साहियं सम्म ॥ *

ज्याप्रमाणे सुदर्शनचक्राद्वारे चक्रवर्ती सहा खंडाना साधतो (जिंकून घेतो) त्याचप्रमाणे मी (नेमिचंद्राचार्य) आपल्या बुद्धीरूपी चक्राने षट्खण्डागमरूप महान सिद्धान्ताला साधले आहे. त्यामुळे त्यांना सिद्धान्तचक्रवर्ती म्हणतात. हे प्रसिद्ध जैन राजा चामुण्डरायाय यांचे समकालीन होते. आणि चामुण्डरायाचा काळ अकराव्या शताब्दीचा पूर्वार्ध आहे. म्हणून आचार्य नेमिचंद्र सुद्धा याचवेळी भारतभूमीला अलंकृत करीत होते.

हे कोणी साधारण विद्वान नव्हते, यांच्याकडून रचल्या गेलेले गोम्मटसार जीवकाण्ड, गोम्मटसार कर्मकांड, त्रिलोकसार, लब्धिसार, क्षपणासार इत्यादी उपलब्ध ग्रंथ त्यांच्या असाधारण विद्वत्तेला आणि 'सिद्धान्तचक्रवर्ती' पदवीला सार्थक (सिध्द) करीत आहेत.

यांनी चामुण्डरायाच्या आग्रहावरून सिध्दान्त ग्रंथांचा सारांश घेऊन गोम्मटसार ग्रंथाची रचना केली तिचे जीवकाण्ड आणि कर्मकाण्ड नावाचे दोन महाअधिकार आहेत. यांचे दुसरे नाव पचसंग्रहदेखील आहे.

या ग्रंथावर मुख्यतः चार टीका उपलब्ध आहेत.

१. अभयचंद्राचार्यांची संस्कृत टीका 'मंदप्रबोधिका' ।
२. केशववर्णींची संस्कृत मिश्रित कन्नड टीका 'जीवतत्त्वप्रदीपिका' ।
३. नेमिचंद्राचार्यांची † संस्कृत टीका 'जीवतत्त्वप्रदीपिका' ।
४. आचार्यकल्प पं. टोडरमलजींची भाषाटीका 'सम्यग्ज्ञानचंद्रिका' ।

प्रस्तुत पाठ गोम्मटसार कर्मकाण्ड या ग्रंथाच्या आधारावर लिहिला आहे.

---

* गोम्मटसार कर्मकाण्ड, गाथा ३९७ ।

† हे नेमिचंद्राचार्य सिद्धांत चक्रवर्ती नेमिचंद्राचार्यांहून वेगळे आहेत.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# कर्म

**चामुण्डराय** – महाराज ! हा आत्मा दुःखी का आहे ? आत्म्याचे हित काय आहे ? कृपा करून सांगावे.

**आचार्य नेमिचंद्र** – आत्म्याचे हित निराकुल सुख आहे. ते आत्म्याच्या आश्रयानेच प्राप्त केले जाऊ शकते. परंतु हा जीव आपल्या ज्ञान–स्वभावी आत्म्याला विसरून मोह-राग-द्वेष रूपी विकारी भाव करतो, म्हणून दुःखी आहे.

**चामुण्डराय** – आम्ही असे ऐकले आहे की, दुःखाचे कारण कर्म आहे.

**आचार्य नेमिचंद्र** – असं नाही भाऊ ! जेव्हा हा जीव स्वतःला विसरून स्वयं मोह-राग-द्वेष भाव रूप विकारी परिणमन करतो, तेव्हा त्यामध्ये कर्माचा उदय निमित्त म्हटला जातो कर्म थोडेच जबरदस्तीने आत्म्याला विकारी करतात ?

**चामुण्डराय** – हे निमित्त निमित्त म्हणतात ते काय आहे ?

**आचार्य नेमिचंद्र** – जेव्हा पदार्थ स्वयं कार्यरूप परिणमतो तेव्हा कार्याच्या उत्पत्तीमध्ये अनुकूल होण्याचा आरोप ज्यावर येतो त्यास निमित्त कारण असे म्हणतात. म्हणून जेव्हा आत्मा स्वतः आपल्या अपराधामुळे विकारादी रूप (दुःखादी रूप) परिणमतो, तेव्हा त्या परिणमनामध्ये कर्माला निमित्त म्हणतात.

**चामुण्डराय** – हे तर ठीक आहे की, हा आत्मा आपल्या अपराधामुळे स्वतःहून दुःखी आहे, ज्ञानावरणादी कर्मामुळे नाही परन्तु तो अपराध काय आहे ?

**आचार्य नेमिचंद्र** – स्वतःला विसरून परामध्ये इष्ट व अनिष्ट कल्पना करून मोह-राग-द्वेष रूप भाव-कर्म (विभाव भावरूप परिणमन) करणे हाच आत्म्याचा अपराध आहे.

**चामुण्डराय** – भाव–कर्म म्हणजे काय ?

**आचार्य नेमिचंद्र** – कर्माच्या उदयामध्ये हा जीव मोह-राग-द्वेष रूपी विकारी भावरूप परिणमतो त्यांना भाव–कर्म म्हणतात आणि त्या मोह-राग-द्वेष भावांचे निमित्त घेऊन कार्माण वर्गणा (कर्मरज) कर्मरूप परिणमित होवून आत्म्याशी सम्बद्ध होतात, त्यांना द्रव्यकर्म म्हणतात.

**चामुण्डराय** – तर कर्मबंधाच्या निमित्ताने आत्म्यामध्ये उत्पन्न होणारे मोह-राग-द्वेषरूप भाव हे भाव–कर्म आहेत आणि कार्माण वर्गणाचे कर्मरूप परिणमित पुद्गलपिण्ड द्रव्य–कर्म आहेत ?

**आचार्य नेमिचंद्र** – होय ! मुख्यरूपाने ही कर्मे आठ प्रकारची आहेत. या आठ कर्मामध्ये ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय, मोहनीय आणि अन्तराय यांना घातिकर्म म्हणतात, आणि वेदनीय, आयु, नाम आणि गोत्र या चार कर्मांना अघाति कर्म म्हणतात.

**चामुण्डराय** – घाति आणि अघाति यांचा अर्थ काय ?

**आचार्य नेमिचन्द्र** – जे जीवाच्या अनुजीवी गुणांचा घात करण्यामध्ये निमित्त होतात त्यांना घाति कर्म म्हणतात. आणि आत्म्याच्या अनुजीवी गुणांचा घात करण्यामध्ये जे निमित्त पडत नाहीत त्यांना अघाति कर्म म्हणतात.

**चामुण्डराय** – ज्ञानगुणावर आवरण टाकणाऱ्या कर्माला ज्ञानावरणीय आणि दर्शनगुणावर आवरण टाकणाऱ्या कर्माला दर्शनावरणीय कर्म म्हणत असतील !

**आचार्य नेमिचंद्र** – ऐका तर खरं ! जेव्हा आत्मा स्वतः आपल्या ज्ञान भावाचा घात करतो. अर्थात ज्ञानशक्तीला व्यक्त करीत नाही, तेव्हा आत्म्याच्या ज्ञानगुणाच्या घातामध्ये ज्या कर्माचा उदय निमित्त असतो त्यास ज्ञानावरणीय असे म्हणतात.

आणि जेव्हा आत्मा स्वतः आपल्या दर्शन गुणाचा (भावाचा) घात करतो तेव्हा दर्शन–गुणाच्या घातामध्ये ज्या कर्माचा उदय निमित्त असतो त्यास दर्शनावरणीय कर्म म्हणतात. ज्ञानावरणीय कर्म पाच प्रकारचे व दर्शनावरणीय नऊ प्रकारचे आहे.

**चामुण्डराय** – आणि मोहनीय – – – – ?

**आचार्य नेमिचंद्र** – जीव आपल्या स्वरूपाला विसरून दुसऱ्या पदार्थांना आपले मानतो व स्वरूपाचरणामध्ये असावधानी करतो तेव्हा ज्या कर्माचा उदय निमित्त असतो त्यास मोहनीय कर्म म्हणतात. हे दोन प्रकारचे आहे – १. दर्शन मोहनीय २. चारित्र मोहनीय मिथ्यात्व आदी तीन प्रकार दर्शन मोहनीयांचे आहेत. २५ कषाय चारित्र मोहनीयाचे भेद आहेत.

**चामुण्डराय** – घातिकर्मापैकी एका अन्तराय कर्माचे वर्णन राहिले.

**आचार्य नेमिचंद्र** – जीवाच्या दान, लाभ, भोग, उपभोग आणि वीर्याच्या विघ्नामध्ये ज्या कर्माचा उदय निमित्त असतो, त्यास अंतराय कर्म म्हणतात. हे पाच प्रकारचे आहे.

**चामुण्डराय** – आता कृपया अघाति कर्मासंबंधी पण - - - ?

**आचार्य नेमिचंद्र** – हं ऐका ? जेव्हा आत्मा स्वयं मोह भावाच्या द्वारे आकुलता करतो तेव्हा अनुकूलता, प्रतिकूलता रूप संयोग प्राप्त होण्यामध्ये ज्या कर्माचा उदय निमित्त होतो त्यास वेदनीय कर्म म्हणतात. हे साता वेदनीय आणि असाता वेदनीय अशा दोन प्रकारचे आहे.

जीव आपल्या योग्यतेने जेव्हा नारकी, तिर्यंच, मनुष्य किंवा देव शरीरामध्ये अडकून असतो, तेव्हा ज्या कर्माचा उदय निमित्त असतो त्या कर्मास आयुकर्म म्हणतात. हे कर्म नरकायु, तिर्यंचायु, मनुष्यायु आणि देवायु अशा चार प्रकारचे असते.

ज्या शरीरामध्ये जीव राहतो. त्या शरीराच्या रचनेमध्ये ज्या कर्माचा उदय निमित्त असतो त्यास नामकर्म म्हणतात. हे शुभ नामकर्म व अशुभ नामकर्म ह्या दोन प्रकारचे असते. तशा यांच्या ९३ प्रकृती आहेत.

आणि जीवाला उच्च व नीच आचरणाच्या कुलामध्ये उत्पन्न होण्यासाठी ज्या कर्माचा उदय निमित्त होतो त्यास गोत्रकर्म म्हणतात. ह्याचे उच्च गोत्र व नीचगोत्र, हे दोन प्रकार आहेत.

**चामुण्डराय** – बस ! कर्माचे आठच प्रकार आहेत ?

**आचार्य नेमिचंद्र** – या आठ भेदांचे पुन्हा प्रभेद आहेत, ज्यांना प्रकृती म्हणतात. आणि त्या १४८ आहेत. आणखी पुष्कळ प्रकारच्या भेदांद्वारे कर्मांना समजले जाऊ शकते, आता एवढेच पुरे. जर विस्ताराने घ्यावयाचे असेल तर गोम्मटसार कर्मकाण्ड इ. ग्रंथाचा अभ्यास करावयास पाहिजे.

**प्रश्न**—

१. कर्म किती प्रकारचे असतात ? नावासहित सांगा
२. द्रव्य कर्म आणि भाव कर्म यांच्यात काय अंतर आहे ?
३. कर्म आत्म्याला जबरदस्तीने विकार करवितात काय ?
४. ज्ञानावरण, मोहनीय व आयु कर्म यांची व्याख्या लिहा.
५. सिद्धांतचक्रवर्ती आचार्य नेमिचंद्र यांचा संक्षिप्त परिचय द्या.

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ६

# रक्षाबंधन

**अध्यापक**–सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, उद्या रक्षाबंधन महापर्व आहे या दिवशी अकंपनाचार्य आदि सातशे मुनींचा उपसर्ग दूर झाला होता. म्हणून हा आमचा आनंदाचा दिवस आहे. या बद्दल उद्या शाळेला सुटी राहील.

**विद्यार्थी** – गुरुजी ! अकंपनाचार्य कोण होते ? त्यांच्यावर कसा उपसर्ग झाला होता ? तो कसा दूर झाला ? कृपाकरून थोडक्यात समजावून सांगावे.

**अध्यापक** – ऐका ! मुलांनो ऐका !!

अकंपनाचार्य एक दिगंबर मुनी होते, त्यांच्याबरोबर सातशे मुनींचा संघ होता आणि ते त्यांचे आचार्य होते. एकदा ते संघाबरोबर विहार करीत करीत उज्जैन नगरीला पोहचले. त्यावेळी उज्जैनचे राजे श्रीवर्मा होते. त्यांचेकडे चार मंत्री होते त्यांची नांवे बली, नमुची, बृहस्पती आणि प्रल्हाद अशी होती.

जेव्हा राजाने मुनींच्या आगमनाची वार्ता ऐकली तेव्हा ते आपल्या राज्यपरिवारासह त्यांच्या दर्शनासाठी गेले. चार मंत्रीही बरोबर होते. सर्व मुनिराज आत्मध्यानात मग्न होते म्हणून प्रवचन–चर्चेचा कोणताही प्रसंग उद्भवला नाही.

मंत्रीगणांना मुनींच्या विषयी आस्था नव्हती. म्हणून त्यांनी राजाला मुनींविरूध्द भडकविण्याचे ठरविले आणि म्हटले, "मौनं मूर्खस्य भूषणम्" मौन मूर्खपणा लपविण्याचे चांगले साधन आहे, हाच विचार करून सर्व साधु गप्प बसले आहेत.

श्रुतसागर मुनिराज आहार करून येत होते. त्यांना पाहून एक मंत्री म्हणाला. "एक बैल (मूर्ख) येत आहे" आणि ते मंत्री मुनिराजांशी वादविवाद करू लागले. मग काय, मुनिराजांनी आपल्या प्रबल युक्तीद्वारे लवकरच त्यांचा गर्व खंडित केला.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

राजासमोर त्या चारही मंत्र्यांच्या अभिमानाचा चुराडा झाला. त्यावेळी तर ते गुपचूप निघून गेले पण रात्रीचौघांनी तेथे येवून मुनिराजांवर प्रहार करण्यासाठी तलवार उचलली, परन्तु त्यांचे उगारलले हात वरच्यावरच राहिले, सकाळी जेव्हा ही वार्ता राजा आणि जनतेने ऐकली तेव्हा सगळे तेथे पोहचले. मुनिराजांची सर्वांनी स्तुती केली आणि राजाने चारही मंत्र्यांना हद्दपारीची शिक्षा दिली.

**विद्यार्थी–** ते मुनिराज रात्री तेथे कसे राहिले ? त्यांनी तर जेथे संघ थांबला तेथेच ध्यानस्थ राहावयास पाहिजे होते.

**अध्यापक–** जेव्हा त्यांनी झालेल्या वादाची चर्चा आचार्यश्रींशी केली तेव्हा ते म्हणाले की, तुम्ही त्यांच्याशी चर्चा करावयास नको होती कारण, ज्याप्रमाणे सापाला दूध पाजल्याने वीषच बनते, त्याचप्रमाणे तीव्र कषायी अज्ञानी जीवांशी केलेली तत्त्वचर्चा त्यांच्या क्रोधालाच वाढवते. कदाचित् ते कषायांच्या तीव्रतेमध्ये काही उपसर्ग करतील म्हणून तुम्ही त्याच ठिकाणावर आज रात्री ध्यानस्थ रहा.

**विद्यार्थी–** मग पुढे - - - - ?

**अध्यापक–** ते चौघे मंत्री हस्तीनापूरचे राजा पद्मरायच्या दरबारी नोकरी करू लागले. कोणत्यातरी कामगिरीवर प्रसन्न होवून पद्म राय राजाने त्यांना इच्छित वरदान मागण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी ते वरदान आम्ही योग्य वेळी मागू अशी अनुमती घेतली.

एकदा तेच अकंपनाचार्य आदी सातशे मुनिराज विहार करीत करीत हस्तीनापूरला पोहचले. त्यांना आलेले पाहून बलीने राजा पद्मरायकडून सात दिवसांसाठी राज्य मागून घेतले. राज्य प्राप्त करून तो मुनिराजांवर घोर उपसर्ग करू लागला.

तेव्हा राजा पद्मरायचे बंधू जे अगोदर विष्णुकुमार मुनी झाले होते त्या मुनिराज विष्णुकुमारांनी त्यांचे रक्षण केले ?

**विद्यार्थी–** अशा दुष्ट शक्तिशाली राजांपासून निःशस्त्र मुनिराजांनी कसे रक्षण केले ?

**अध्यापक–** विष्णुकुमार मुनींना विक्रिया ऋद्धी प्राप्त होती.

**छात्र–** विक्रिया ऋद्धी म्हणजे काय ?

**अध्यापक–** ज्या ऋद्धीच्या सामर्थ्यामुळे आपल्या शरीराला पाहिजे तेवढे मोठे किंवा लहान बनवता येते, तिला विक्रिया ऋद्धी म्हणतात.

मुनिराजांनी आपल्या पदाचा त्याग करून (बावनिया) बटूचे रूप धारण केले आणि ते बलीच्या दरबारात पोहोचले. बलीने त्यांना इच्छेनुसार वस्तु मागण्याची प्रार्थना केली.त्यांनी आपल्या पावलांनी तीन पावले भूमी मागितली. जेव्हा बलीने तीन पावले जमीन देण्याचे कबूल केले तेव्हा त्यांनी आपले शरीर वाढवून सर्व भूमी दोन पावलातच व्यापून टाकली, अशा रितीने बलीला परास्त करून मुनीराजांची रक्षा केली. तो श्रावणातील पौर्णिमेचा दिवस होता. म्हणून त्या दिवसापासून रक्षाबंधन पर्व सुरू झाले. मुनिराजांची रक्षा झाली आणि बलीला बंधन झाले.

**विद्यार्थी–** काय मुनीच्या अवस्थेत हे सर्व होऊ शकते ?

**अध्यापक–** नाही बाळ ! तुम्ही लक्ष देवून ऐकले नाही. आम्ही सांगितले ना की त्यांनी मुनिपदाचा त्याग करून बटूचा वेष धारण केला. हे कार्य त्यांच्या पदाला योग्य नव्हते, म्हणून तर त्यांना प्रायश्चित घ्यावे लागले, दुसऱ्यांदा दिक्षा घ्यावी लागली.

**विद्यार्थी–** धन्य आहे त्या मुनी विष्णुकुमारांची !

**अध्यापक–** वास्तविक धन्य तर ते अकंपनाचार्यादी सातशे मुनिराज आहेत, की ज्यांना एवढी संकटेसुद्धा आत्मध्यानापासून परावृत करू शकली नाहीत.

**विद्यार्थी –** होय ! आणि बली आदींशी विवाद करून त्यांचा गर्व खंडित करणारे श्रुतसागर मुनीदेखील धन्य होत.

**अध्यापक –** त्यांची विद्वत्ता तर प्रशंसनीयच आहे पण दुष्टांशी विवाद करावयास नको होता. आत्म्याची साधना करणाऱ्यास दुष्टांशी वादविवाद करणे बरोबर नाही.

**विद्यार्थी –** कां बरे ?

**अध्यापक–** पहा ना, त्याचा परिणाम म्हणूनच एवढे भांडण झाले म्हणून प्रत्येक आत्मार्थीने जगाच्या प्रपंचापासून दूर राहून तत्त्वाभ्यासात प्रयत्नशील राहिले पाहिजे. हाच संसार–बंधनापासून रक्षणाचा खरा उपाय आहे.

**प्रश्न—**

१. रक्षाबंधन कथा आपल्या शब्दात लिहा.
२. मुनी विष्णुकुमारांना उपसर्ग निवारणार्थ मुनिपद का सोडावे लागले ?
३. श्रुतसागर मुनिराजांना अकंपनाचार्यांनी वादविवादाच्या ठिकाणी जावून रात्री ध्यानस्थ होण्याचा आदेश का दिला ?
४. वरील कथा वाचून आपले विचार व्यक्त करा.

---

१ ज्याचे शरीर फारच लहान म्हणजे बावन्न बोटांचे त्यांना बावनिया म्हणतात.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ७ | जम्बूस्वामी

**कविवर पं. राजमलजी पाण्डे**
**(व्यक्तित्व एवं कर्तृत्व)**

"पांडे राजमल्ल जिनधर्मी, नाटक समयसार के मर्मी"
बनारसीदास

राजस्थानातील ज्या प्रमुख विद्वानांनी आत्म-साधनेच्या अनुरूप साहित्य आराधनेला आपले जीवन समर्पित केले आहे. त्यात पं. राजमलजींचे नाव विशेष रूपाने उल्लेखनीय आहे. यांचे प्रमुख निवास-स्थान ढुँढाहढ प्रदेशातील वैराटनगर व मातृभाषा ढुंढारी होती. संस्कृत आणि प्राकृत भाषेचे सुद्धा उच्चकोटीचे ते विद्वान होते.

हे सतराव्या शताब्दीचे प्रमुख विद्वान बनारसीदासांच्या पूर्व-कालीन होते. त्यांचा पहिला ग्रंथ जम्बूस्वामी चरित्र सं. १६३३ मध्ये पूर्ण झाला होता, म्हणून यांचा जन्म निश्चितपणे १७ व्या शताब्दीच्या प्रारंभी झाला असावा.

यांची प्रतिभा बहुमुखी होती. हे कवी टीकाकार विद्वान आणि वक्ते होते. यांच्या कवितेत काव्य गुणाबरोबर अध्यात्म व गंभीर तत्त्वांचे गूढ विवेचन आहे. यांच्या द्वारे रचल्या गेलेल्या खालील रचना उपलब्ध आहेत.

| | |
|---|---|
| १. जम्बूस्वामी चरित्र | ४, तत्त्वार्थसूत्र टीका |
| २. छंदोविद्या | ५. समयसार कलश बालबोध टीका |
| ३. अध्यात्मकमलमार्तंड | ६. पंचाध्यायी |

प्रस्तुत पाठ त्यांनी रचलेल्या जम्बूस्वामी चरित्राच्या आधारावरून लिहिला गेला आहे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# जम्बूस्वामी

**ताई–** अन्तिम तीर्थंकर भगवान महावीर पूर्ण वीतरागी आणि सर्वज्ञ होते. त्यांच्यानंतर कोणी पूर्ण वीतरागी आणि सर्वज्ञ झाले काय?

**भाऊ–** होय ! होय !! का न ही झाले ? त्यांच्यानंतर गौतमस्वामी, सुधर्माचार्य आणि जम्बूस्वामी पूर्ण वीतरागी आणि केवलज्ञानी झाले. या युगाचे अन्तिम केवली जम्बूस्वामीच आहेत.

**ताई–** तर महावीर स्वामींच्या प्रमाणे जम्बूस्वामी पण राजकुमार असतील ?

**भाऊ–** नाही ताई, ते तर राजगृह नगरीच्या एका राजमान्य शेठजींचे पुत्र होते. त्यांच्या वडिलांचे नाव अर्हद्दास व मातेचे नाव जिनमती असे होते. जम्बुकुमारांचा जन्म फाल्गुन पौर्णिमेला झाला होता.

श्रेष्ठिपुत्र जम्बुकुमारांचे राजा श्रेणिकाच्या दरबारात आणि तत्कालीन समाजात महत्वपूर्ण स्थान होते. नगरातील अनेक श्रीमंताना आपल्या गुणवती कन्यांचे लग्न जम्बूकुमारांच्या बरोबर करण्याची इच्छा होती. आणि त्यांचा चार कन्यांशी वाङ्निश्चयसुद्धा झाला होता. परन्तु – – –

**ताई–** परन्तु काय ?

**भाऊ–** परन्तु ते तर लहानपणापासूनच वैराग्यरसाने भारावलेले होते. त्यांचे मन आत्म्याच्या अनंत अतीन्द्रिय आनंदासाठी तळमळत होते. म्हणून त्यांनी लग्न करावयास स्पष्ट नकार दिला.

**ताई–** नकार दिला ? जुळलेले लग्न मोडले ? लग्न नाही केले ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**भाऊ–** त्यांची तर विवाह न करण्याचीच इच्छा होती. पण जेव्हा चार कन्यांनी ही गोष्ट ऐकली तेव्हा त्या म्हणाल्या लग्न होईल तर जम्बूकुमारांशीच नाही तर नाही.

**ताई–** मग – – – – ?

**भाऊ–** मग काय ? चारही मुलींचे आई-वडिल व जम्बूकुमारांचे आई–वडील यांनी खूप आग्रह केला. वाटल्यास तुम्ही नंतर दीक्षा घेवून टाका पण लग्नास नकार देऊ नका, कारण त्यांची अशी समजूत होती की, आपल्या सर्वांगसुंदरी मुली आपल्या रूप व गुणांनी जम्बूकुमारांचे मन जिकून घेतील आणि जम्बूकुमार वैराग्य विचार विरून जातील, परन्तु – – – –

**ताई–** परन्तु काय ?

**भाऊ–** जम्बुकुमारांनी लग्न करण्याची कबुली तर दिली, पण संसारातील विषयवासना त्यांच्या मनाला आपल्याकडे आकर्षित करू शकल्या नाहीत.

**ताई–** म्हणजे काय लग्न झाले नाही ?

**भाऊ–** लग्न तर झाले पण दुसऱ्याच दिवशी जम्बूकुमार घर-दार, कुटुंब, धन–धान्य आणि देवांगना–तुल्य चारही स्त्रीयांचा त्याग करून नग्न दिगंबर साधु बनले.

**ताई–** त्यांच्या पत्नींची नावे काय होती ? त्यांनी जम्बूकुमारांना दिक्षा घेण्यापासून परावृत्त केले नाही काय ?

**भाऊ–** त्यांची नावे पद्मश्री, कनकश्री, विनयश्री आणि रूपश्री अशी होती. त्यांनी आपले हाव–भाव, रूप लावण्य, सेवा–भाव व बुद्धी-चातुर्याने पूर्ण प्रयत्न केला, पण आत्मानंदामध्ये मग्न राहण्याची अभि-लाषा असलेल्या जम्बूकुमाराच्या मनाला त्या विचलीत करू शकल्या नाहीत.

**ताई–**बरोबरच आहे ! रागी लोकांचा राग ज्ञानी लोकांना प्रभावित करू शकेल काय ? ज्ञान आणि वैराग्याचे किरण तर अज्ञान आणि राग यांचा नाश करण्यास समर्थ ठरतात.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**भाऊ–** अगदी बरोबर म्हणतेस ताई ! त्यांच्या ज्ञान आणि वैराग्याचा प्रभाव त्याच रात्री जम्बूकुमारांच्या घरी चोरी करावयास आलेल्या विद्युच्चर नावांच्या चोरावर सुद्धा पडला. त्याने जंबूकुमाराची आणि त्यांच्या नव–परिणीता स्त्रीयांची चर्चा ऐकली व जंबूकुमाराची वैराग्य परिणती पाहून तोदेखील त्यांच्याबरोबर मुनी झाला.

**ताई–** अन् त्या कन्यांचे काय झाले ?

**भाऊ–** त्यांनी आपल्या दृष्टीला विषय–कषायापासून हटवून वैराग्याकडे वळवले. व दिक्षा घेवून अर्जिका बनल्या. जंबूस्वामींच्या माता–पित्यांनी पण अर्जिका व मुनीपद धारण केले.

याप्रमाणे सर्वच वातावरण वैराग्यमय झाले. जंबूकुमार मुनी निरंतर आत्म–साधनेत मग्न राहू लागले. आणि माघ शुद्ध सप्तमीच्या दिवशी त्यांचे गुरु सुधर्माचार्यांना निवार्णपद प्राप्ती झाली. त्यादिवशी जंबूस्वामींना केवलज्ञान प्राप्त झाले.

**ताई–** ज्याप्रमाणे महावीरांचा निर्वाण-दिवस व गौतमाचा केवल ज्ञान दिवस एकच आहे, त्याचप्रमाणे सुधर्माचार्यांचा निर्वाण दिवस आणि जंबूस्वामींचा केवलज्ञान दिवस एकच झाला.

**भाऊ–** होय ! त्यानंतर जंबूस्वामींच्या दिव्यध्वनीद्वारे १८ वर्षा-पर्यंत मगधापासून मथुरेपर्यंत तत्त्वोपदेश होत राहिला. आणि शेवटी ते चौरासी (मथुरा)* येथून मोक्षास गेले.

**प्रश्न––**

१. जम्बूस्वामींचे संक्षिप्त चरित्र आपल्या भाषेत सांगा.
१. महाकवी पं. राजमलजी पांडे यांचे व्यक्तित्व व कर्तृत्वावर प्रकाश टाका.

---

* पं. राजमलजी यांना विपुलाचलावरून मोक्षास गेले असे मानतात.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ८

# बारा भावना

**पं. जयचंदजी छाबडा**

(व्यक्तित्व एवं कर्तृत्व)

(संवत् १७९५–१८८१)

जयपूरच्या प्रतिभाशाली आत्मार्थी विद्वानांमध्ये पं. जयचंदजी छाबडांचे एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. यांचा जन्म जयपूरपासून तीस मैल दूर डिग्गी–मालपुरा रोडवर असलेल्या फागई (फागी) गावात झाला. यांचे वडिलांचे नाव मोतीरामजी छाबडा असे होते

अकरा वर्षाच्या लहान वयात यांची रूची तत्त्वज्ञानाकडे वळली होती. काही काळानंतर हे फागईहून जयपूरला आले, तेथे यांना महापण्डित टोडरमलजी आदींचा सत्समागम प्राप्त झाला. यांना आध्यात्मिक ज्ञान जयपूरच्या तेरापंथी सैलित प्राप्त झाले होते. याबद्दल त्यांनी खालीलप्रमाणे उल्लेख केला आहे.

सैलि तेरापंथ, सुपंथ, तामें बडे गुणी गुन–ग्रंथ
तिनकी संगति में कछु बोध, पायो मैं अध्यातम सोध ।।

यांचे सुपुत्र पं. नंदलालजी पण महान विद्वान होते. पं. जयचंदजींनी स्वत: त्यांची प्रशंसा लिहिली आहे.

मुख्यत: यांच्या रचना म्हणजे टीकाग्रंथ आहेत, ज्याना वचनिका म्हटले जाते. यांनी लिहिलेल्या मौलिक रचनादेखील आहेत. यांचे काही महत्वपूर्ण ग्रंथ खालीलप्रमाणे आहेत.

१. तत्त्वार्थसूत्र वचनिका
२. सर्वार्थसिद्धी वचनिका
३. प्रमेय रत्नमाला वचनिका
४. द्रव्यसंग्रह वचनिका
५. समयसार वचनिका
६. अष्टपाहुड वचनिका
७. ज्ञानार्णव वचनिका
८. धन्यकुमार चरित्र वचनिका
९. कार्तिकेयानुप्रेक्षा वचनिका
१०. पद–संग्रह

प्रस्तुत बाराभावना यांनीच लिहिलेल्या आहेत.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# बारा भावना

**अनित्य**
द्रव्य रूप करि सर्व थिर, परजय थिर है कौन ।
द्रव्यदृष्टि आपा लखो, परजय नय करि गौन ॥

**अशरण**
शुद्धातम अरु पंच गुरु, जग में सरनौ दोय ।
मोह उदय जिय के वृथा, आन कल्पना होय ॥

**संसार**
पर द्रव्यन तें प्रीति जो, है संसार अबोध ।
ताको फल गति चार में, भ्रमण कह्यो श्रुत शोध ॥

**एकत्व**
परमारथ तें आतमा, एक रूप ही जोय ।
कर्म निमित्त विकलप घने, तिन नासे शिव होय ॥

**अन्यत्व**
अपने अपने सत्वकूँ, सर्व वस्तु विलसाय ।
ऐसें चितवै जीव तब, पर तें ममत न थाय ॥

**अशुचि**
निर्मल अपनी आतमा, देह अपावन गेह ।
जानि भव्य निज भाव को, यासों तजो सनेह ॥

**आस्त्रव**
आतम केवल ज्ञानमय, निश्चय-दृष्टि निहार ।
सब विभाव परिणाम-मय आस्रव भाव विडार ॥

**संवर**
निज स्वरूप में लीनता, निश्चय संवर जानि ।
समिति गुप्ति संजम धरम, धरें पाप की हानि ॥

वैराग्योत्पत्तीच्या काळात बारा भावनांचे चिंतवन करणारे ज्ञानी जीव खालील प्रमाणे विचार करतात.

**अनित्य** द्रव्यदृष्टीने पाहिले असता सर्व जग स्थिर आहे,पण पर्याय दृष्टीने काहीच स्थिर नाही. म्हणून पर्यायार्थिक नयाला गौण करून द्रव्यदृष्टीने एक आत्मानुभूतीच करण्यायोग्य कार्य आहे.

**अशरण** या विश्वात दोनच शरण आहेत निश्चयाने निज शुद्धात्मा शरण आहे आणि व्यवहाराने पंच परमेष्ठी, परन्तु मोहाच्या कारणाने हा जीव अन्य पदार्थांना शरण मानतो.

**संसार** निश्चयाने पर-पदार्थाविषयी मोह-राग-द्वेष भावच संसार आहे. याच कारणामुळे जीव चार गतींमध्ये दु:ख भोगत भ्रमण करतो.

**एकत्व** निश्चयाने आत्मा एक ज्ञान स्वभावीच आहे. कर्माच्या निमित्ताच्या अपेक्षेने कथन केल्याने त्याला अनेक विकल्प-मय सुद्धा म्हटले आहे. या विकल्पांच्या नाशानेच मुक्ती प्राप्त होते.

**अन्यत्व** प्रत्येक पदार्थ आपल्या आपल्या सत्तेतच विकास करीत आहे, कोणी कोणाचा कर्ता-हर्ता नाही. जेव्हा जीव असे चिंतवन करतो, तेव्हा परांशी ममत्व होत नाही.

**अशुचि** आपला आत्मा निर्मल आहे. परंतु हे शरीर महान अपवित्र आहे, म्हणून हे भव्य जीवांनो ! आपल्या स्वभावाला ओळखून या अपवित्र देहावरील प्रेम सोडा.

**आस्रव** निश्चय दृष्टीने पाहिले असता आत्मा केवळ ज्ञानमय आहे. विभावभावरूप परिणाम तर आस्रवभाव आहेत, जे नाश करण्यायोग्य आहेत.

**संवर** निश्चयाने आत्मस्वरूपात लीन होणेच संवर आहे त्याचे कथन समिति, गुप्ति आणि संयम रूपाने केले जाते, त्यांना धारण केल्यामुळे पापांचा नाश होतो.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**निर्जरा** संवरमय है आतमा, पूर्व कर्म झड जाय।
निज स्वरूप को पायकर, लोक शिखर जब थाय ॥

**लोक** लोक स्वरूप विचारिकें, आतम रूप निहार।
परमारथ व्यवहार गुणि, मिथ्याभाव निवारि ॥

**बोधिदुर्लभ** बोधि आपका भाव है, निश्चय दुर्लभ नाहिं।
भव में प्रापति कठिन है, यह व्यवहार कहाहिं ॥

**धर्म** दर्शज्ञानमय चेतना, आतम धर्म बखानि।
दया क्षमादिक रत्नत्रय, यामें गर्भित जानि ॥

o o o

**निर्जरा** ज्ञानस्वभावी आत्माच संवर (धर्म) मय आहे. त्याच्या आश्रयानेच पूर्वोपार्जित कर्मांचा नाश होतो आणि हा आत्मा आपल्या स्वभावास प्राप्त करतो.

**लोक** लोका (षट् द्रव्य) च्या स्वरूपाचा विचार करून आपल्या आत्म्यात लीन व्हावयास पाहिजे. निश्चय आणि व्यवहार यांना चांगल्यारितीने जाणून मिथ्यात्व भावांना दूर करावयास पाहिजे.

**बोधिदुर्लभ** ज्ञान आत्म्याचा स्वभाव आहे, म्हणून तो निश्चयाने दुर्लभ नाही. संसारात व्यवहारनयाने आत्मज्ञानाला दुर्लभ म्हटले आहे.

**धर्म** आत्म्याचा स्वभाव ज्ञान-दर्शनमय आहे. दया, क्षमा इत्यादी दशधर्म आणि रत्नत्रय सगळे यात गर्भित आहेत.

**प्रश्न—**

१. खालील भावनांना छंद आणि अर्थासहित लिहा.
अनित्य, एकत्व, संवर, बोधिदुर्लभ.

२. पं. जयचंदजी छाबडा यांच्या व्यक्तित्व कर्तृत्वावर प्रकाश टाका.

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# हमारे यहाँ प्राप्त महत्त्वपूर्ण प्रकाशन

| ग्रन्थ | मूल्य |
|---|---|
| सम्यग्ज्ञान चन्द्रिका भाग-१ | ४०/- |
| ब्रहद्जिनवाणी संग्रह / मोक्षशास्त्र | २८/- |
| सम्यग्ज्ञान चन्द्रिका भाग-२, ३ | २५/- |
| समयसार | २२/- |
| प्रवचनसार / अष्टपाहुड / समयसार | २०/- |
| अनुशीलन भाग-१ सम्पूर्ण आ. अमृतचन्द्र: | ,, |
| व्यक्तित्व और कर्तृत्व | ,, |
| नियमसार / समयसार कलश टीका | १८/- |
| परमभाव प्रकाशक नयचक्र | १६/- |
| सिद्धचक्र विधान / पंचास्तिकाय / | १५/- |
| समयसार नाटक / धवलसार / मोक्षमार्ग | ,, |
| प्रकाशक / प्रवचनरत्नाकर भाग-२ | ,, |
| प्रवचनरत्नाकर भाग-१ / भावदीपिका | १३/- |
| संस्कार / प्रवचनरत्नाकर भाग-६ / | १२/- |
| ज्ञानस्वभाव-ज्ञेयस्वभाव / जिनेन्द्र | ,, |
| अर्चना / इन्द्रध्वज विधान | ,, |
| पं. टोडरमल : व्यक्तित्व और कर्तृत्व / | ११/- |
| आत्मा ही है शरण | ,, |
| आ. कुन्दकुन्द और उनके टीकाकार / | १०/- |
| कालजयी व्यक्तित्व : बनारसीदास / | ,, |
| प्रवचनरत्नाकर भाग-३, ४, ५ व ७ | ,, |
| राम कहानी | ९/- |
| सत्य की खोज / पुरुषार्थसिद्ध्युपाय / | ८/- |
| वारसाणुवेक्खा / श्रावकधर्म प्रकाशक | ,, |
| तीर्थंकर भगवान महावीर और उनका | ७/- |
| सर्वोदय तीर्थ / ज्ञानगोष्ठी / परीक्षामुख / | ,, |
| विदाई की वेला / चौबीस तीर्थंकर पूजन | ,, |
| विधान / पंचकल्याणक महोत्सव पूजन / | ,, |
| भक्तामर प्रवचन / वीतराग-विज्ञान | ,, |
| पाठमाला भाग-१, २, ३ का सेट | ,, |
| धर्म के दशलक्षण / बारह भावना | ६/- |
| एक अनुशीलन / जिनवरस्य नयचक्रम् / | ,, |
| आप कुछ भी कहो / बालबोध पाठमाला | ,, |
| भाग-१, २, ३ | ,, |
| क्रमबद्ध पर्याय / गागर में सागर / | ५/- |
| आ. कुन्दकुन्द और उनके पंचपरमागम / | ,, |

| ग्रन्थ | मूल्य |
|---|---|
| कारणशुद्धपर्याय / छहढाला सचित्र / | ५/- |
| बनारसी विलास / णमोकार महामंत्र / | ,, |
| अर्द्धकथानक / अध्यात्म संदेश / | ,, |
| वीतराग-विज्ञान प्रवचन भाग-३, ४ | ,, |
| तत्त्वज्ञान पाठमाला भाग १ एवं २ | ,, |
| सुखी होने का उपाय भाग-१, २ एवं ३/ | ४/- |
| वीतराग-विज्ञान प्रवचन भाग-२ / | ,, |
| मनीषियों की दृष्टि में समयसार / | ,, |
| शान्तिविधान / रत्नत्रय पूजन-विधान / | ,, |
| भक्ति सरोवर / जैन बालपोथी भाग-१ / | ,, |
| गुणस्थान प्रवेशिका / जैन बालपोथी | ,, |
| भाग-२ / सत्तास्वरूप/पदार्थ विज्ञान / | ,, |
| सामान्य श्रावकाचार / जिनपूजन रहस्य | ,, |
| पंचकल्याण प्रतिष्ठा महोत्सव / वीतराग | ३/- |
| विज्ञान प्रवचन-१ चौंसठ ऋद्धि विधान / | ,, |
| पंचपरमेष्ठी पूजन विधान / | ,, |
| वीर हिमाचल ते निकसी | ,, |
| अहिंसा महावीर की दृष्टि में / | २/५० |
| निमित्तोपादान / चिद्विलास | ,, |
| मैं कौन हूँ / लघु जैनसिद्धान्त प्रवेशिका / | २/- |
| चैतन्य चमत्कार / भरत बाहुबली नाटक / | ,, |
| शान्तिसुधा / मुक्ति का मार्ग / | ,, |
| आत्मसम्बोधन / जिनधर्म प्रवेशिका / | ,, |
| जैनमुहूर्त्त विधि | ,, |
| सार समयसार / | १/५० |
| शाश्वत तीर्थधाम : सम्मेदशिखर | ,, |
| कुन्दकुन्द शतक / समयसार पद्यानुवाद | १/२५ |
| णमोलोए सव्वसाहूणं / बारहभावना एवं | १/- |
| जिनेन्द्र वन्दना / शुद्धात्म शतक / तीर्थंकर | ,, |
| भगवान महावीर / अनेकान्त और | ,, |
| स्यादवाद् / शाकाहार : जैनदर्शन के | ,, |
| परिप्रेक्ष्य में / जैन झण्डा गायन | ,, |
| अर्चना (जेबी साइज) / | /७५ |
| गोम्मटेश्वर बाहुबली | ,, |
| योगसार पद्यानुवाद / उपासना | /५० |
| वीतरागी व्यक्तित्व : भगवान महावीर | /२५ |